**प्रेस नोट** दिनांक १७/०३/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर |
| २ | गु.र.क्र | पोलीस स्टेशन उदगीर शहर गुरन ६२/२०२२ |
| ३ | कलम | ७अ, १२ भ.प्र. अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | १.प्रविण कल्याणराव सताळे वय ४० वर्षे पद संगणक परिचालक पंचायत समिती उदगीर ता. उदगीर जि. लातूर रा. न्यू आबादी येरमे नगर उदगीर जि. लातूर , **ईलोसे**<br>२.सतिष रोहीदास शिंदे वय ३८ वर्षे, व्यवसाय रिक्षाचालक रा. शेकापूर ता. उदगीर जि. लातूर , **खाजगी इसम** |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | ९००/— रुपये (सुरूवातीस ४००/—रूपये द्या, नंतर ५००/—रूपये द्या) |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ४००/— रुपये |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | ४००/— रुपये |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांनी त्यांचे आईच्या नावे शेकापूर ता. उदगीर जि. लातूर गट नं. १९४ मध्ये चालु वर्षा मध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत मिळालेल्या गोठाशेडचे मजुरांचे ऑनलाईन हजेरी मस्टर भरुन देण्याच्या कामासाठी खाजगी इसम सतिष शिंदे यांनी पंचायत समिती उदगीर चे ऑनलाईन मजुरांची हजेरी मस्टर भरणारे डाटा इंट्री ऑपरेटर सताळे साहेब यांना ९००/—रूपये दयावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली.<br>फिर्यादी यांना नमुद व्यक्तीना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १६/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर लेखी तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुसरून केलेल्या पडताळणीत खाजगी इसम सतिष शिंदे यांनी पंचायत समिती उदगीर येथील डाटा इंट्री ऑपरेटर सताळे यांचेसाठी एकुण ९००/— रूपये (सुरूवातीस ४००/—रूपये द्या, नंतर ५००/—रूपये द्या) असे म्हणुन लाचेची मागणी केली त्यावेळी समक्ष हजर असलेल्या डाटा इंट्री ऑपरेटर सताळे यांनी लाचेची रक्कम मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि १६/०३/२०२२ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील खाजगी ईसम सतिष शिंदे यांनी पंचासमक्ष डाटा इंट्री ऑपरेटर सताळे यांचेसाठी पंचायत समिती उदगीर समोरील हॅाटेलवर १५.५३ वा. सुमारास ४००/—रूपये लाचेची स्विकृती करून डाटा इंट्री ऑपरेटर सताळे यांना कळविले असता त्यांनी लाच स्विकृतीस होकार दर्शविला म्हणुन गुन्हा नोंद. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिति असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर विभागाशी संपर्क साधावा.

(पंडीत रेजितवाड)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १) | धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :— | १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :— | ०२४८२—२४२६७४ |
| ५) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :— | www.facebook.com/MaharashtraACB |

Scanned with CamS